# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/11/2022 (रविवार ) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ७०० कि. मी. अंतरावरील भांडेकर ले आऊट उमरेड येथे फिर्यादी नामे—चक्रेशकुमार सुधाकर जाधव, वय ३५ वर्ष, रा. १६७ भांडारकर ले आऊट उमरेड हे दिवाळी सणानिमीत्त तसेच मुलीचे जावळयाच्या पुजेकरीता बाहेर गावी दिनांक ३१/१०/२०२२ रोजी जळगाव येथे गेले होते व परत दिनांक ०६/११/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. परत आले असता त्यांचे घरातील समोरील दरवाज्याचा कोंडा तुटलेला दिसला व दरवाजा अर्धा उघडा दिसला. घराच्या आत जावून पाहीले असता दोन्ही रूम मधील लोखंडी आलमारीचा कोंडा तुटलेला दिसला. व त्यामधुन सामान डॉक्युमेंट व एटीएम कार्ड अस्तव्यस्त दिसले व त्या आलमारीमध्ये ठेवलेले सोने चांदीचे दागिने १) जुनी सोन्याची अंगठी ०५ ग्रॅम किमती अंदाजे १५,०००/—रू., २) सोन्याची जुनी लेडीज अंगठी ०३ ग्रॅम किमती अंदाजे ९,०००/—रू., ३) मुलीची सोन्याची अंगठी ०१ ग्रॅम किमती ३०००/—रू., ४) एक सोन्याची नथ ०२ ग्रॅम किमती ६०००/—रू., ५) जुनी गळयातील सोन्याची जिवती दिड ग्रॅम किमती अंदाजे ४५००/—रू. ६) जुनी सोन्याची गळयातील डोरले ०१ ग्रॅम किमती ३०००/—रू., ७) जुनी सोन्याची कमनी ०२ ग्रॅम किमती ६०००/—रू., ८) लहान मुलाचे हातापायाचे चांदीचे कडे ३० ग्रॅम व जुन्या काळातील चांदीचे ०६ सिक्के किमती ६०००/—रू. आलमारीतील ठेवलेली नगदी १०,०००/—रू. असा एकुंण किमती ६२,५००/—रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन उमरेड करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा जामगाव येथे दिनांक ०५/११/२०२२ चे १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुनिल पुंडलीकराव भलावी, वय ४६ वर्ष, रा. जामगाव (बु), ता. नरखेड जि. नागपुर यांना चार भाऊ असुन फिर्यादीचा लहान भाऊ नामे—अरूण हा सन २०१९ मध्ये आजाराने मरण पावला आहे. त्याची पत्नी व दोन मुली नामे— आंकाक्षा व अंकीता अशा गावातच वेगळया राहतात तसेच त्या दोन्ही मुली शिक्षण शिकत आहे. यातील फिर्यादी हे अंदाजे १६.०० वा ते १७.०० वा. चे दरम्यान आपले घरी हजर असताना फिर्यादीचा भाचा योगेश आहाके याने माहीती दिली की, कु. आकांक्षा अनिल भलावी, वय १७ वर्ष, रा. जामगाव, ता. नरखेड हीने तिचे राहते घरी फाशी घेतली आहे. त्यावरून फिर्यादीने घटनास्थळी जावुन पाहीले असता यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी कु. आंकाक्षा हिने घरातील खोलीत सिलींगला असलेल्या पंख्याचे लोंखडी रॉडला ओढणीने बांधुन त्या ओढणीने गळफास घेवुन आत्महत्या केली असल्याचे दिसले तसेच मृतक हिचे आत्महत्येबाबत कोणताही संशय नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन जलालखेडा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर